Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता व शैक्षणिक संपादनाचा सहसंबंधात्मक अभ्यास.

**प्रा.डॉ.संध्या अ. सामुद्रे**
शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला

**जयश्री विजय गीते**
शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला

## सारांश

शैक्षणिक दृष्टया विविध प्रकारच्या मुलांचा विचार करतांना देशातील दिव्यांग बालकांच्या व दिव्यांगांच्या विकासाच्या दृष्टीने “दिव्यांग कायदा १९९५ व त्याच कायदयात सुधारणा करून दिव्यांग कायदा २०१६." सुरू करून दिव्यांगांच्या विकासाच्या दृष्टीने जे पाऊल उचलले ते सकारात्मक व प्रेरणादायी आहे. सशक्त, सुदृढ आणि निरोग मूल असावे. व त्यांच्या संगोपनात आपण आपलेच सिंहावलोकन अनुभवाने हे खरे तर प्रत्येकाचेच स्वप्न असते. मात्र काही स्वप्नांना दिव्यांगत्वाचा शाप जन्मतःच लाभतो किंबहुना नियती, प्रारब्ध, संचित असे काही असेल तर त्याचे भोग जन्मासोबतच येतात. आणि मग अवयवांच्या या त्रुटी अथवा विकलांगपणाला कार्यरत करण्याकरता संपूर्ण आयुष्यपणाला लागते. असे परावलंबी अवयव बुद्धी, गती, मती, असहकार असलेले मूल व त्यांचे कुटुंबिय नित्य नव्याने वेगवेगळया समस्येला आयुष्यभर तोंड देत राहतात. असामान्य म्हणून जन्माला आलेल्या जीवाला सामान्य जीवन जगता येत. २०११ च्या जणगणनेनुसार प्राप्त दिव्यांगांची संख्या खूप मोठी आहे. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्या यांची तुलना केली असता दिसून येते की, दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक अधिकार प्राप्तीच्या दृष्टीने भारत देशाला मोठी प्राप्ती बाकी आहे. ६ वर्ष वयाच्या बालकांपासून ते उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग शिक्षणासंबंधी कोणत्याही प्रकारची माहीती प्राप्त होत नाही. वयाच्या २१ वर्षापर्यंत ज्या दिव्यांगांना शिक्षण आवश्यक आहे. अशा दिव्यांगांची संख्या २०११ च्या जणगणेनुसार १.२३ करोड आहे. ज्यापैकी ५३.४ लाख दिव्यांग मुली आणि महीला आहेत. तसेच जवळपास २० लाख दिव्यांग प्राथमिक, माध्यमिक आणि विशेष शाळेत शिक्षण घेत आहे. दिव्यांगांच्या बाबतीत शिक्षणाचा आवाका विविध प्रकारे वाढविण्याचा प्रयत्न होत नाही. तरी देखिल जेव्हा दिव्यांगांना शिक्षण देण्याची वेळ येते तेव्हा सरकारची जबाबदारी आणखी वाढते. वास्तविकता ही हे की, शासनाकडून अनेक शिक्षण अभियान राबविले गेलेत. परंतु अदयापही परिस्थिती समाधानकारक नाही. अशावेळी शासनास आणखी योग्य पध्दतीने आपल्या योजना अवलंबिणे आवश्यक आहे. ज्यामुळे देशातील दिव्यांग व्यक्ती व विद्यार्थी यांचे भविष्य तेजोमय असेल. नवीन शिक्षण पध्दतीने यामध्ये आशा उत्पन्न केलेली आहे.असे सगळे वास्तव चित्र असले तरी देखिल समाजात वावरतांना दिव्यांग विद्यार्थ्याचं मोठ प्रमाण असे आहे की, शासकीय सुविधा असुन देखिल ते शिक्षण व स्वविकासापासुन किती तरी दूर आहेत. या परिस्थिती मागील कारणांचा विचार केला असता दिव्यांग विद्यार्थी शैक्षणिक दृष्टया अप्रगत असण्याचे कारणे दिसून येतात. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये सामाजिक भौगोलिक, कौटुंबिक, आर्थिक,सांस्कृतिक घटक यांचा परिणाम व भावनिक बुद्धीमत्तेचा समावेश कसा असतो हे अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. या परिस्थितीच्या अभ्यासाने दिव्यांगांना मोठया प्रमाणात शैक्षणिक प्रवाहात आणता येईल म्हणून संशोधकास सदर विषय महत्वाचा वाटला. याकरिता परिस्थितीनुरूप चाचण्या देखिल तयार कराव्या लागतील.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**मुख्य शब्द :** दिव्यांग विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता व शैक्षणिक संपादनाचा सहसंबंधात्मक अभ्यास.

**संशोधन निबंध शीर्षक :-** अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता व शैक्षणिक संपादनाचा सहसंबंधात्मक अभ्यास.

## संशोधन निबंध विषयाची उद्दिष्टे :-

अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा अभ्यास करणे.

अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचा शोध घेणे.

अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वता व शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

## संशोधन निबंध परिकल्पना

अमरावती विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वता व शैक्षणिक संपादन यात सहसंबंध नाही.

## संशोधन पध्दतीची निवड :

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधित असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली आहे.

**प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड :** प्रस्तुत संशोधनासाठी यादुच्छिक पध्दतीने 100 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. नमुना सुगम यादृच्छिक पध्दतीने निवडण्यात आला आहे.

## संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनात चाचणी या साधनाचा अंवलब करण्यात आला आहे.

## संशोधन निबंध विषयाचे निष्कर्ष

अभ्यासात त्यांचा सहभाग ही केवळ संशोधकाची गरज होती, त्यांची स्वतःची नाही.

ग्रामीण भागातील मतिमंद मुलांच्या पालकांनी प्रशिक्षण स्वीकारले नाही, कारण त्यांची मुले सर्व बाबतीत त्यांच्यावर अवलंबून होती.

व्यवस्थापनाची कामे पार पाडण्याचा कार्यक्रम काही पालकांनी काटेकोरपणे पाळला, तर इतर पालकांनी तो काटेकोरपणे पाळला नाही.

मुलाने दिलेल्या कामांना सकारात्मक प्रतिसाद दिल्यासच पालक प्रशिक्षण सुरू ठेवत होते की नाही, हे अभ्यासातून स्पष्टपणे सिद्ध झाले नाही. हा निष्कर्ष अनिर्णायक होता.

पालकांना जेव्हा संदर्भ दिला गेला, तेव्हा त्यांच्या मुलासाठी जे क्षेत्र अपुरे आहे असे वाटत होते, त्याच क्षेत्रात काम करण्याकडे त्यांचा कल होता.

कार्यक्रम जसजसा पुढे चालू राहिला, तसतसे मतिमंद मुलाप्रति पालकांच्या वागणुकीत बदल झाला.

मुख्य निष्कर्ष असा होता की ग्रामीण भागातील पालक त्यांच्या मतिमंद मुलांचे शिक्षक म्हणून भूमिका स्वीकारण्यास तयार नव्हते.

## संशोधन निबंध शिफारशी

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थी एकत्र शिक्षण घेत असतांना दिव्यांग विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. या अडचणी जाणून घेण्याकरीता संशोधनाची गरज भासते.

दिव्यांगांना शिक्षणाने विचार करण्याची क्षमता वाढते व जीवन जगण्याची दिशा बदलते हे समजण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाबाबतची जाणीव जागृती करण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे.

## संदर्भ सूची

स्वामी विवेकानंद " Education is the manifestation already in man- Swami Vivekanand- Education " पृ.क्र. 358

रंजना संतोष गटकळ (ऑगस्ट 2005) " माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास ", नाशिक : प्राजक्ता प्रकाशन,पृ.क्र.102.

म. बा. कुंडले (1990) " शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र ", पुणे : विद्या प्रकाशन, पृ.क्र.20.

करंदिकर सुरेश (1994),"शैक्षणिक मासनशास्त्र", फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृ.क्र 23

जगताप ह. ना. (2006)"शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र" नित्य नूतन प्रकाशन, पुणे. पृ.क्र 56

जगताप ह.ना, (2006), "शैक्षणिक मानसशास्त्र", नूतन प्रकाशन, पुणे. पृ.क्र 45

दांडेकर वा. ना. (२००७)"शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र", श्री विद्या प्रकाशन, पुणे. पृ.क्र 36

पंडीत, र. वि., "शैक्षणिक मानसशास्त्र", पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ.क्र 89

मानकर पी. एल., शिरोडे एस. एन. (2004),"सुबोध शौक्षणिक व प्रायोगिक मानसशारु", नूतन प्रकाशन, पुणे. पृ.क्र 21